N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0396 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/12/2025 15:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/08/2025

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2025

**Time From (वेळेपासून):** 11:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/12/2025 **Time (वेळ):** 14:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 013

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/12/2025 14:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** न्युसिटी हायस्कुल,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complaint / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** यशवंत विश्वनाथ बोरसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन लिलाधर ठाकुर | | | 1. प्लॉट नं- ,33 दोंदे कॉलनी, देवपुर, धुळे ,धुळे शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी सुमारे 05 महिन्यापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे. आम्ही दि.01.08.2025 रोजी कार्यालयात दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार श्री. निलेश भानुदास सुर्यवंशी, रा रावळगांव, ता. मालेगांव जि. नाशिक यांनी समक्ष ला.प्र.वि. धुळे कार्यालयात हजर राहुन पोलीस उप अधीक्षक श्री. सचिन साळुंखे यांची भेट घेवुन धुळे येथील न्यु सिटी हायस्कुलचे शिक्षक त्यांच्याकडे लाचेची मागणी करीत असले बाबत सांगितल्याने पोलीस उप अधीक्षक श्री साळुंखे यांनी आंम्हास त्यांचे कक्षात बोलावुन तक्रारदार यांची तक्रार एकुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हास निर्देश दिले. त्यावरून मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांना पंच मिळणेबाबत दिलेल्या पत्रान्वये हर्षद श्रीपाद जोशी, वरिष्ठ लिपीक व महेंद्र सुरेश कापडे, कनिष्ठ लिपीक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात उपलब्ध करून घेतले. त्यानंतर आम्ही त्यांची ओळख करुन घेवुन त्यांना आमची ओळख सांगुन कार्यालयात हजर असलेले तक्रारदार निलेश भानुदास सुर्यवंशी यांची व पो.कॉ. मकरंद पाटील यांची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार निलेश सुर्यवंशी यांना त्यांच्या तक्रारीची थोडक्यात तोंडी हकीगत पंचासमक्ष कथन करण्यास सांगितले असता त्यांनी पुढील प्रमाणे हकिगत कथन केली ''मी व माझी बहिण नामे कुमारी निशा भानुदास सुर्यवंशी असे शिक्षण घेत आहोत. आम्हांस शैक्षणिक कामासाठी आमचे हिंदु ठाकुर या जातीचे जात पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मी व माझ्या बहिणीचे हिंदु ठाकुर जातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळणेकरीता सह आयुक्त, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, धुळे कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रांसह दि.25.08.2022 रोजी अर्ज प्रकरण जमा केले असुन त्याची टोकन पावती घेतली आहे. परंतु सुमारे तीन वर्ष होवुन देखील आम्हास आजपावेतो जात पडताळणी प्रमाणपत्र मिळालेले नाही.

आमचे जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत चौकशी करणेकरीता मी सुमारे 15 दिवसापुर्वी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, धुळे कार्यालयात गेलो होतो. तेथे माझी लिपिक सौरभ सोनवणे यांचेशी भेट झाली. तेव्हा मी त्यांना जात पडताळणीसाठी जमा केलेल्या प्रकरणाचे टोकन दाखवुन आमचे प्रकरणांबाबत त्यांचेकडे चौकशी केली. तेव्हा त्यांनी ''तुंम्हास तुमचे जात पडताळणी प्रमाणपत्राचे काम करुन घ्यायचे असेल तर तुम्ही धुळयातील न्यु सिटी हायस्कुलचे शिक्षक नितिन ठाकुर यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन भेटा. या कार्यालयातील जात पडताळणी प्रमाणपत्राची कामे त्यांच्या मार्फतीनेच करुन दिले जातात.'' असे सांगितले. तेव्हा मी माझ्या नातेवाईकाकडुन शिक्षक श्री. नितिन ठाकुर यांचा मोबाईल क्र.7588516331 मिळविला. त्यानंतर मी शिक्षक श्री. नितिन ठाकुर यांच्या मोबाईलवर दि.23.07.2025, दि.26.07.2025 रोजी संपर्क साधुन त्यांच्याशी आमचे जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत चर्चा केली. तेव्हा त्यांनी ''माझे धुळे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या अधिकाऱ्यांशी घनिष्ठ संबंध असुन ते माझे मार्फतीनेच पैसे घेवुन जात पडताळणीचे काम करुन देतात, त्यांना मी विचारुन आपणांस सांगतो, तुम्ही मला 2/3 दिवसांत फोन करा.'' असे मला सांगितले.

त्याप्रमाणे मी नितिन ठाकुर यांना दि.31.07.2025 रोजी पुन्हा त्यांच्या मोबाईलवर फोन लावुन आमचे जात पडताळणी प्रमाणपत्राच्या कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी ''मी धुळे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या साहेबांना तुमच्या जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता त्यांनी मला एका प्रमाणपत्रास 2 ते 3 लाख रुपये दयावे लागतील. आज मी बाहेरगावी असुन उदया मला माझ्या शाळेत येवुन भेटा.'' असे सांगितल्याची तोंडी हकीगत कथन केली.त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. सदर तक्रार आम्ही व पंचांनी वाचुन पाहुन सदर तक्रारी अर्जावर व त्यासोबतच्या कागदपत्रांवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्या सोबत चर्चा करून पंचांपैकी पंच नं. 01 श्री. हर्षद

जोशी यांना तक्रारदार यांचे सोबत धुळे येथील न्यु सिटी हायस्कुल मध्ये पाठवुन शिक्षक श्री. नितीन ठाकुर यांची भेट घेवुन तक्रारदार यांच्या नमुद तक्रारीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवुन त्यांना पंच नं. 1 जोशी यांचेसह ला.प्र. विभाग, धुळे कार्यालयातुन दुचाकीने रवाना केले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.1 जोशी हे दुचाकीने ला.प्र. विभाग, धुळे कार्यालयात परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे कडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून आम्ही पंच नं. 1 यांना तक्रारदार यांच्या सोबत शिक्षक श्री. नितीन ठाकुर यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्या पासुन ते परत येई पावेतोची हकीगत विचारणा करता त्यांनी ''मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने ला.प्र.वि. धुळे कार्यालातुन रवाना होवुन धुळे शहरातील न्यु सिटी हायस्कुलच्या गेट जवळ जावुन थांबलो. त्यानंतर मी व तक्रारदार दुचाकीच्या खाली उतरलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल वरुन शिक्षक नितिन ठाकुर यांना फोन करुन ते न्यु सिटी हायस्कुलच्या गेटजवळ उभे असलेबाबत सांगितले असता शिक्षक नितिन ठाकुर यांनी तक्रारदार यांना शाळेच्या आत येण्यास सांगितले.
त्यानंतर तक्रारदार यांनी शाळेच्या मुख्य गेटने आत प्रवेश केला असता तेथील वॉचमनने तक्रारदार यांना काय काम असले बाबत विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांनी शिक्षक नितिन ठाकुर यांना भेटायचे असलेबाबत सांगितले असता वॉचमनने तक्रारदार यांना शाळेच्या आत जाण्यास सांगितले. तेव्हा मी तक्रारदार यांच्या मागोमाग काही अंतर ठेवुन शाळेच्या गेटमधुन आत प्रवेश केला असता वॉचमनने मला काय काम असलेबाबत विचारणा केली. तेव्हा मी माझ्या मुलीची वॉटर बॉटल राहिली आहे असे समयसुचक उत्तर देवुन शाळेच्या आत प्रवेश केला व तक्रारदार यांचेकडे लक्ष ठेवुन काही अंतरावर थांबलो. तेव्हा शाळेतील एका शिक्षकाने तक्रारदार यांना इशारा करुन शाळेच्या टिचररुम मध्ये येण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी मला सदर शिक्षक हे नितिन ठाकुर असलेबाबत इशाऱ्याने खुणावले. त्यानंतर तक्रारदार व शिक्षक नितिन ठाकुर असे सदर शाळेच्या टिचररुम मध्ये जावुन बसले. तेव्हा मी देखील त्यांच्या मागोमाग जावुन टिचररुमच्या दरवाजाला आडोसा घेवुन त्यांचेकडे लक्ष देवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार व शिक्षक नितिन ठाकुर यांच्यात तक्रारदार व त्यांचे बहिणीचे जात पडताळणी प्रकरणाचा कामाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान शिक्षक नितिन ठाकुर यांनी तक्रारदार यांना त्यांचे व त्यांच्या बहिणीचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी ''खर्च करण्याची तयारी ठेव, अडीच ते तीन लाख रुपये एकाला खर्च येईल, मी साहेबांना तुझे प्रकरणाचे टोकन व्हॉटसअपला पाठविले आहे, त्यांनी सांगितल्यावर मी तुला कळवतो.'' असे सांगितल्याची हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 1 हर्षद जोशी यांनी सांगितल्याप्रमाणेच हकिगत सांगितली.
त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयात तक्रारदार व शिक्षक नितिन ठाकुर यांच्यात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार व पथक असे सर्वांनी ए्कल्या नंतर तक्रारदार व पंच यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे तक्रारदार व शिक्षक नितिन ठाकुर यांच्यात तक्रारदार व त्यांच्या बहिणीचे जात पडताळणी प्रकरणाचा कामाबाबत चर्चा होवुन चर्चे दरम्यान शिक्षक नितिन ठाकुर यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे व बहिणीचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी अनुसुचित जमाती पडताळणी समिती येथील अधिकारी यांचे नावाने अडीच ते तीन लाख एका जात वैधता प्रमाणपत्रास खर्च येईल असे सांगुन लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.
त्यानंतर आम्ही शिक्षक नितिन ठाकुर यांनी अनुसुचित जमाती पडताळणी समिती येथील अधिकारी यांनी त्यांना कळविल्यावर ते तक्रारदार यांना पुढील बाबी सांगणार असल्याचे सांगितल्याने आम्ही सदर सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करुन शिक्षक नितीन ठाकुर यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडे राठोड साहेबांच्या नावाने लाचेची मागणी केलेली असल्याने तक्रारदार यांना राठोड साहेबांची भेट घेवुन पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी दि.05.08.2025 रोजी माझे व बहिणीचे जात पडताळणी प्रकरणावर अनुसुचित जमाती जात पडताळणी धुळे कार्यालयात सुनावणी असुन त्या दिवशी राठोड साहेबांना भेटुन पडताळणी करता येईल असे आम्हांस सांगितले होते. त्याप्रमाणे आम्ही दि.05.08.2025 रोजी वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री. राठोड यांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर आम्ही दि.05.08.2025 रोजी हर्षद श्रीपाद जोशी, वरिष्ठ लिपीक व महेंद्र सुरेश कापडे, कनिष्ठ लिपीक, म.रा.वि.वि.कंपनी, धुळे हे कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर आम्ही पंचाना दि.01.08.2025 रोजी तक्रारदार यांचेकडे वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री.राठोड यांचे नावाने तक्रारदार यांच्या जात वैधता प्रमाणपत्राकरीता प्रत्येकी अडीच ते तीन लाख रुपयांची मागणी केलेली असल्याने त्या अनुषंगाने आपणांस तक्रारदार यांना त्यांच्या आज रोजी होणाऱ्या जात पडताळणीची सुनावणी आटोपल्यानंतर तक्रारदार यांना पंच नं. 01 श्री. जोशी यांचेसह वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री. राठोड यांची भेट घेवुन तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करावयाची आहे असे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्या सोबत चर्चा करून पंचांपैकी पंच नं. 01 म्हणुन श्री. हर्षद जोशी यांना तक्रारदार यांचे सोबत अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, धुळे येथे पाठवुन वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री. राठोड यांची भेट घेवुन तक्रारदार यांच्या नमुद तक्रारीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना पडताळणी कार्यवाही बाबत सविस्तर सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून देवुन त्यांना पंच नं. 1 जोशी यांचेसह ला.प्र. विभाग, धुळे कार्यालयातुन दुचाकीने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.1 जोशी हे दुचाकीने ला.प्र. विभाग, धुळे कार्यालयात परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून आम्ही पंच नं. 1 यांना तक्रारदार यांच्या सोबत वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री. राठोड यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्या पासुन ते परत येई पावेतोची हकीगत विचारणा केली असता त्यांनी ''मी व तक्रारदार असे त्यांच्या दुचाकीने आपल्या पासुन रवाना होवुन जात पडताळणी कार्यालयात गेलो. तेव्हा सदर कार्यालय राठोड साहेबांबाबत विचारणा करुन राठोड साहेब वरच्या मजल्यावर असल्याची माहिती मिळाल्याने तक्रारदार व मी इमारतीच्या वरच्या मजल्यावर गेलो. तेथे तक्रारदार यांनी माझेसह राठोड साहेब यांची त्यांच्या कक्षात भेट घेतली. तेव्हा राठोड साहेबांनी तक्रारदार यांचेशी त्यांचे प्रकरणाबाबतच चर्चा केली. परंतु राठोड साहेबांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केलेली नाही.'' अशी हकीकत कथन केली. तसेच तक्रारदार यांनी देखील मिळतीजुळती हकीकत सांगितली. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर आम्ही दि.27.11.2025 रोजी श्री. हर्षद श्रीपाद जोशी, वरिष्ठ लिपीक व श्री. महेंद्र सुरेश कापडे, कनिष्ठ लिपीक यांना पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. त्यानंतर तक्रारदार यांनी पंचांसमक्ष सांगितले की, दि.05.08.2025 रोजी सुमारे 7 ते 8 दिवसांनंतर तक्रारदार हे त्यांचे खाजगी कामासाठी धुळे येथे आले असतांना शिक्षक नितीन ठाकुर यांची जुन्या आग्रा रस्त्यावर अचानक भेट झा  झाली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली तेव्हा शिक्षक नितीन ठाकुर यांनी तक्रारदार यांना ''तुमच्या जात पडताळणी प्रमाणपत्रा बाबत समिती पुढे सुनावणी झाली असुन त्यानंतर सुमारे 2/3 महिन्यात निर्णय घेतला जातो. तेव्हा समितीचे अधिकारी मला कळवतील तेव्हा मी तुम्हाला भेटण्यास बोलवितो'' असे सांगुन तक्रारदार हे शिक्षक नितीन ठाकुर यांचेशी मोबाईलद्वारे वेळोवेळी संपर्कात होते. परंतु ते आता तक्रारदार यांचा फोन उचलत नसल्याचे आम्हांस सांगितले.

तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेशी दोन्ही पंचा समक्ष चर्चा करुन तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 01.08.2025 रोजी झालेल्या पडताळणी कार्यवाहीच्या अनुषंगाने दि.27.11.2025 रोजी शिक्षक नितीन ठाकुर यांचेवर सापळा लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी आज रोजी त्यांच्याकडे 50,000/- रुपये असुन सदरची रक्कम सापळा कारवाई दरम्यान शिक्षक नितीन ठाकुर यांना देवुन उर्वरीत रक्कम त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्राचे काम झाल्यावर देवु असे त्यांना सांगु असे आम्हास पंचासमक्ष सांगितले. तेव्हा आमच्या सुचनेवरून तक्रारदार यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेले लाचेच्या सापळाकामी वापरण्याकरीता लागणारे 50,000/- रुपयाच्या चलनी नोटा टेबलावर ठेवल्या. त्यात 500/-रु. दराच्या 100 चलनी नोटा असुन त्यांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर आम्ही ॲन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचे गुणधर्म सांगुन सदर नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावण्याचे प्रात्यक्षीक आमच्या सुचनेवरून पोकॉ/सागर शिर्के यांनी करून दाखविले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ/सागर शिर्के यांनी त्या अ.पा. लावलेल्या नोटा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवून दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सापळा कार्यवाही बाबत सविस्तर सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 1 यांना शिक्षक नितिन ठाकुर यांना लाचेची रक्कम देण्यासाठी ला.प्र. विभाग, धुळे कार्यालयातुन तक्रारदार यांच्या दुचाकीने रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 मेटकर व सापळा पथक असे खाजगी कारने रवाना होवुन न्यु सिटी हायस्कुल, धुळे परिसरात तक्रारदार यांच्या मागोमाग जावुन आजुबाजुस सुरक्षित जागा घेवून त्यांचेवर लक्ष ठेवून थांबुन राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे पंच नं.01 जोशी यांचेसह शाळेच्या गेट बाहेर पायी चालत आले. तेव्हा त्यांनी शिक्षक नितीन ठाकुर यांनी पैसे स्विकारले नसल्याचा आम्हास हाताने इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच नं. 01 यांना ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही, पंच नं. 02 व सापळा पथक असे खाजगी कारने निघुन ला.प्र.वि. धुळे कार्यालयात आलो.

त्यानंतर आम्ही पंच नं. 1 व तक्रारदार यांना पंच नं.2 यांचे समक्ष लाचेची रक्कम घेवून रवाना केल्यापासून तक्रारदार याचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करे पावेतोची हकिगत विचारली असता. पंच नं. 1 यांनी ''तक्रारदार यांची माझयासमक्ष  नितीन ठाकुर यांचेशी भेट झाली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या जात पडताळणीच्या कामाबाबत काय झाले व साहेबांना कळविणार होते तसेच तुम्ही अडीच अडीच लाख रुपये सांगितले होते असे त्यांना सांगितले असता नितीन ठाकुर यांनी तक्रारदार यांना त्यांनी तसे सांगितले नसल्याचे सांगुन तक्रारदार यांना वकीलास

भेटुन प्रोसेस करुन घे असे सांगितले. तसेच त्यांनी तक्रारदार यांचेशी त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रिये बाबत चर्चा करुन तक्रारदार यांचेकडुन पैसे घेण्यास टाळाटाळ केली." अशी हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 यांचे सांगणेप्रमाणे मिळती जुळती हकिगत सांगितली. तसा सविस्तर सापळा स्थगिती पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे दि.01.08.2025 रोजी 12:33 ते 13:09 यावेळी धुळे येथील न्यु सिटी हायस्कुल येथे श्री. नितीन ठाकुर, शिक्षक, न्यु सिटी हायस्कुल, धुळे यांनी पंचासमक्ष तक्रारदार श्री. निलेश भानुदास सुर्यवंशी यांचेकडे त्यांचे व त्यांच्या बहिणीचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी धुळे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या अधिकाऱ्यांच्या नावाने स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी अनाधिकाराने प्रती प्रमाणपत्रास प्रत्येकी 2,50,000/- रुपये ते 3,00,000/- रूपये लाचेची मागणी करुन त्यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याचे निष्पन्न झाले असल्याने त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dipak dagadu patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dipak dagadu patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
शहर पोलीस स्टेशन